मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# पीसीएमसीचा 2026-27 अर्थसंकल्प मार्चमध्ये

## लोकप्रतिनिधींच्या काळातील पहिल्याच अर्थसंकल्पात करसवलत, पाणीपट्टी आणि मूलभूत सुविधांवर लक्ष?

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेचा सन 2026-27 चा अर्थसंकल्प मार्च महिन्यात सादर होणार आहे. प्रशासकीय राजवट जाऊन लोकप्रतिनिधीच्या काळातील म्हणजे या पंचवार्षिकीतील तो पहिला अर्थसंकल्प असणार आहे. या अर्थसंकल्पास शहरवासीयांना काय गिफ्ट मिळणार, याची उत्सुकता निर्माण झाली आहे.



महापालिकेचा अर्थसंकल्प दरवर्षी फेब्रुवारी महिन्यात सादर करण्याची प्रथा आहे. मात्र, यंदा सहा फेब्रुवारीला महापौरपदाची निवड होणार आहे. त्यानंतर महापालिकेचे कामकाज पदाधिकारी व नगरसेवकांमार्फत सुरू होणार आहे. साहजिकच सत्ताधारी भाजपाच्या ध्येय-धोरणानुसार अर्थसंकल्पावर छाप असणार आहे. त्यामुळे अर्थसंकल्प मार्च महिन्यात नव्या पदाधिकाऱ्यांकडून सादर केला जाणार आहे. दरम्यान, आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी अर्थसंकल्पासंदर्भात विभागप्रमुखांची बैठक घेत सूचना दिल्या आहेत. लेखा व वित्त विभागाने सर्व विभागांकडून त्याची माहिती मागविण्यास सुरुवात केली आहे. आगामी वर्षातील उत्पन्न, खर्च, प्रलंबित कामे तसेच, नवीन विकासकामांचा समावेश असलेले प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

आर्थिक नियोजनासाठी हा टप्पा महत्त्वाचा असून, प्रत्येक विभागाकडून मागील वर्षातील प्रत्यक्ष खर्च, अपेक्षित महसूल, करआकारणी, अनुदाने, भांडवली व महसुली खर्चाचा तपशील मागवण्यात आला आहे. सुरू असलेली विकासकामे, अपूर्ण प्रकल्प आणि मूलभूत सुविधांसाठी आवश्यक निधीची मागणीही स्पष्टपणे नमूद करण्याचे निर्देश विभागप्रमुखांना देण्यात आले आहेत. निवडणुकीनंतर हा अर्थसंकल्प सादर होणार असल्याने, प्रशासकीवर संतुलित आणि वास्तववादी अर्थसंकल्प मांडण्यावर भर दिला जाणार आहे. पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य, शिक्षण, घनकचरा व्यवस्थापन, वाहतूक आणि पर्यावरण या विभागांना प्राधान्य देण्याची शक्यता आहे. लेखा व वित्त विभागाकडून प्राप्त माहितीच्या आधारे एकत्रित अर्थसंकल्प तयार करण्यात येणार आहे. मार्चमध्ये तो सादर केला जाईल. सर्व विभागांनी ठरवून दिलेल्या मुदतीत अचूक व सविस्तर माहिती सादर करावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. मार्च महिन्यात अर्थसंकल्प सादर करण्याचे नियोजन लेखा व वित्त विभागाने केले आहे.

लोकप्रतिनिधींच्या काळातील हा अर्थसंकल्प असल्याने त्यात शहरवासीयांना काय गिफ्ट मिळणार, याकडे लक्ष लागले आहे. मालमत्ताकरात सूट मिळणार का, त्याचे दर कमी होणार का, रेड झोनमधील मालमत्तांना करात किती सूट मिळणार, पाणीपट्टीचे दर घटणार का, आदीबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

### सर्व विभागांकडून माहिती मागविण्यास सुरुवात

» **महापालिकेच्या सन 2026-27 च्या अर्थसंकल्पाबाबत सध्या प्राथमिक बैठक पार पडली आहे. आयुक्तांनी सूचना करत आढावा घेतला आहे. त्यानुसार, सर्व विभागांकडून माहिती मागवण्याचे काम सुरू आहे. अर्थसंकल्प मार्च महिन्यात सादर करण्याचे नियोजन आहे, असे महापालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांनी सांगितले.**

# निवडणुकीनंतर शहरात मोठ्या प्रमाणात अनधिकृत बॅनर आणि फ्लेक्सबाजी

## तात्काळ कारवाईची आमदार अमित गोरखे यांची आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्याकडे मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीनंतर शहरात अनधिकृत बॅनर आणि फ्लेक्सबाजी मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसून येत आहे. तरी हे अनधिकृत फ्लेक्स आणि बॅनर तात्काळ हटवण्याची कारवाई करावी अशी मागणी विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांनी महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्याकडे केली आहे.



आमदार अमित गोरखे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक नुकतीच पार पडली असून, निवडणुकीनंतर शहरात अनधिकृत बॅनर, पोस्टर व फ्लेक्स मोठ्या प्रमाणावर लावण्यात आल्याचे चित्र दिसून येत आहे. विजयी उमेदवार तसेच विविध राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनी विजयाच्या आनंदात शहरातील प्रमुख चौक, रस्ते, उड्डाणपूल, सिग्नल परिसर व इतर सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात जाहिराती लावल्यामुळे शहराच्या सौंदर्यावर परिणाम होत आहे. या अनधिकृत बॅनर व फ्लेक्समुळे सार्वजनिक मालमत्तेचे विद्रूपीकरण होत असून काही ठिकाणी वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याचेही दिसून येत आहे. यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्वच्छ, सुंदर व नियोजनबद्ध शहर म्हणून ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवड शहराच्या प्रतिमेला अशा अनधिकृत जाहिराती बाधा पोहोचवत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व अनधिकृत बॅनर, पोस्टर व फ्लेक्स तात्काळ हटविण्यात यावेत अशी मागणी आमदार अमित गोरखे यांनी महानगरपालिका आयुक्तांकडे केली आहे.

महानगरपालिकेच्या संबंधित विभागाने याबाबत त्वरित कारवाई करून शहरातील अनधिकृत जाहिराती काढून टाकाव्यात, जेणेकरून शहराची सुव्यवस्था व सौंदर्य कायम राहील, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व अनधिकृत बॅनर, पोस्टर व फ्लेक्स तात्काळ हटविण्यात यावेत अशी मागणी आमदार अमित गोरखे यांनी महानगरपालिका आयुक्तांकडे केली आहे.

# अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाचे भव्य लोकार्पण संपन्न

## "जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय" मोरवाडी येथे अत्यंत सन्माननीय वातावरणात व मोठ्या उत्साहात लोकार्पण करण्यात आले.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहराच्या न्यायालयीन इतिहासात आजचा दिवस ऐतिहासिक व अभिमानास्पद ठरला. शहराला दीर्घ प्रतीक्षेनंतर स्वतःचे हक्काचे "जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय" मोरवाडी येथील जुनी न्यायालयीन इमारत येथे अत्यंत सन्माननीय वातावरणात व मोठ्या उत्साहात लोकार्पण करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते झाडाच्या रोपाला पाणी घालून करण्यात आली.



या न्यायालयाचे लोकार्पण मुंबई उच्च न्यायालयाचे मा. न्यायमूर्ती श्री. संदीप मारणे साहेब व मा. न्यायमूर्ती श्री. आरिफ डॉक्टर साहेब यांच्या शुभहस्ते तर पुणे जिल्ह्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मा. श्री. एम. के. महाजन साहेब व पिंपरी चिंचवड अॅडव्होकेट्स बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड.गौरव वाळुंज यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. या वेळी बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाचे चेअरमन अॅड. हर्षद निंबाळकर, सदस्य अॅड. उदय वारंजीकर, अॅड. राजेंद्र उमाप, अॅड. अहमद खान पठाण, अॅड. विठ्ठल कोंडे देशमुख यांच्यासोबत बारचे माजी अध्यक्ष व पदाधिकारी त्याचबरोबर न्यायव्यवस्थेतील मान्यवर, प्रशासकीय अधिकारी, न्यायालयीन कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पिंपरी चिंचवडसारख्या वेगाने वाढणाऱ्या औद्योगिक, व्यापारी व लोकसंख्येच्या दृष्टीने महत्त्वाच्या शहरासाठी स्वतंत्र अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाची आवश्यकता अनेक वर्षांपासून प्रकर्षाने जाणवत होती. आज या न्यायालयाच्या लोकार्पणामुळे शहरातील न्यायप्रक्रिया अधिक जलद, सुलभ, परिणामकारक व लोकाभिमुख होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या सत्र न्यायालयामुळे आता नागरिकांना न्यायासाठी पुणे येथील न्यायालयांवर अवलंबून राहावे लागणार नाही. त्यामुळे वेळेची बचत, आर्थिक दिलासा आणि मानसिक ताणात घट होऊन सर्वसामान्य नागरिकांना वेळेत न्याय मिळण्यास मोठी मदत होणार आहे. तसेच वकील वर्ग व न्यायालयीन कर्मचारी यांच्यासाठीही कामकाज अधिक सुसूत्र, कार्यक्षम आणि सुव्यवस्थित होणार आहे.

"पिंपरी चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या, झपाट्याने होणारे शहरीकरण आणि प्रकरणांची वाढती संख्या लक्षात घेता, भविष्यात स्वतंत्र मोटर वाहन न्यायालय व कौटुंबिक न्यायालय स्थापन होणे अत्यंत आवश्यक आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना अधिक सुलभ, जलद आणि विशेषीकृत न्याय मिळू शकेल. या गरजेचा गांभीर्याने विचार करण्यात येत असून, त्याबाबत लवकरच सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल, असे मत मा. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. संदीप मारणे यांनी व्यक्त केले."

पिंपरी चिंचवड शहर हे राज्यातील अग्रगण्य औद्योगिक शहरांपैकी एक असून येथे औद्योगिक, दिवाणी, फौजदारी तसेच श्रमविषयक प्रकरणांची संख्या सातत्याने वाढत आहे. परिणामी न्यायालयीन कामकाजावर मोठा ताण निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाची आज झालेली स्थापना न्यायदान प्रक्रियेला नवी गती देणारी ठरणार असून, न्यायव्यवस्थेवरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ करणारी ठरेल. मोरवाडी येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयात जिल्हा न्यायाधीश म्हणून श्रीमती एस.एस. नायर साहेब तर दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर म्हणून श्री डोंगरे साहेब यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

> **"जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचा प्रश्न अनेक वर्षे प्रलंबित होता. आज तो प्रत्यक्षात उतरला, हे पिंपरी चिंचवडच्या न्यायव्यवस्थेसाठी महत्त्वाचे आहे. हे न्यायालय शहराच्या वाढत्या गरजांना पूरक असून न्यायदान अधिक कार्यक्षम आणि लोकाभिमुख होण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावेल. आज झालेले उद्घाटन हे न्यायव्यवस्थेमधील मैलाचा दगड ठरेल."**
>
> -अॅड. उमेश राम खंदारे ,सचिव,
> पिंपरी चिंचवड अॅडव्होकेट्स बार असोसिएशन

# पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयासाठी एकात्मिक सीसीटीव्ही प्रकल्पास HPCची मान्यता

## AI-आधारित शहरव्यापी निगराणीमुळे गुन्हे नियंत्रण व सार्वजनिक सुरक्षा अधिक सक्षम

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या तंत्रज्ञानाधारित पोलिसिंगला मोठे बळ मिळाले असून, संपूर्ण आयुक्तालय क्षेत्रासाठी प्रस्तावित अत्याधुनिक एकात्मिक सीसीटीव्ही निगराणी प्रकल्पास महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या उच्चस्तरीय समितीने (HPC) मान्यता दिली आहे. गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या महत्त्वपूर्ण प्रकल्पाला हिरवा कंदील देण्यात आला.




वेगाने विकसित होणारे औद्योगिक व नागरी शहर असलेल्या पिंपरी-चिंचवडमध्ये कायदा व सुव्यवस्था, गुन्हे प्रतिबंध, वाहतूक नियंत्रण, गर्दी व्यवस्थापन तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

अलिकडच्या काळात शहराच्या झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येचा विचार करून पिंपरी-चिंचवड पोलिस दलाने पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ केली आहे. सहा नवीन पोलिस ठाण्यांची स्थापना, दहा सहाय्यक पोलिस आयुक्त, पाच पोलिस उप-आयुक्त आणि एका अतिरिक्त पोलिस आयुक्त पदाची निर्मिती करून त्या पदांवर सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यासोबतच नवीन पोलिस आयुक्तालय इमारत, पोलिस ठाण्यांच्या इमारती, प्रशस्त परेड मैदान, आधुनिक मोटार परिवहन विभाग तसेच विविध पोलिस कार्यालयांसाठी आवश्यक जमीन संपादन करण्यात आली आहे.

या पायाभूत सुविधांच्या जोडीने आता मंजूर झालेला सीसीटीव्ही निगराणी प्रकल्प संपूर्ण आयुक्तालयासाठी एकात्मिक व केंद्रीकृत व्यवस्था निर्माण करणार आहे. या प्रकल्पाअंतर्गत पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी मिशन आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमार्फत आधीच बसविण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे एकत्रित करण्यात येणार असून, ज्या ठिकाणी अद्याप कव्हरेज नाही अशा महत्त्वाच्या भागांत नवीन कॅमेरे बसविण्यात येणार आहेत.

चाकण, तळेगाव आणि भोसरी एमआयडीसीसारख्या प्रमुख औद्योगिक परिसरांबरोबरच हिंजवडी आयटी हबमध्ये विशेष निगराणी ठेवण्यात येणार आहे. तसेच देहू आणि आळंदी या धार्मिक तीर्थक्षेत्रांमध्ये सण-उत्सव व पालखी काळात होणाऱ्या लाखो भाविकांच्या गर्दीचे प्रभावी नियोजन व वाहतूक व्यवस्थापन करण्यासाठी मजबूत सीसीटीव्ही जाळे उभारण्यात येणार आहे.

या प्रकल्पात एआय-आधारित प्रगत व्हिडिओ अॅनालिटिक्सचा वापर करण्यात येणार असून, त्याच्या माध्यमातून गुन्हे शोध, गुन्हे तपास, वाहतूक नियमांची अंमलबजावणी, गर्दी नियंत्रण आणि आपत्कालीन प्रतिसाद अधिक वेगवान व प्रभावी होणार आहे. नव्या पोलिस आयुक्तालयात अत्याधुनिक एकात्मिक कमांड अँड कंट्रोल सेंटर स्थापन करण्यात येणार असून, त्याचे थेट दृश्य सर्व परिमंडळ पोलिस उप-आयुक्त, वाहतूक विभाग व पोलिस ठाण्यांना उपलब्ध राहणार आहे.

# अस्वच्छ पुणेकरांनी वर्षभरात दंड म्हणून भरले 3.77 कोटी

## 1 जानेवारी ते 31 डिसेंबर 2025 दरम्यान 53 हजार नागरिकांवर कारवाई; सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करणाऱ्यांची संख्या वाढली.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेकडून शहर स्वच्छतेसाठी जनजागृती केली जात असतानाच, सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करणाऱ्या पुणेकरांची संख्या वाढत आहे. १ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत महापालिकेकडून शहरात अस्वच्छता करण्यास जबाबदार असलेल्या ५३ हजार ३९३ पुणेकरांवर कारवाई करीत त्यांच्याकडून तब्बल ३ कोटी ७७ लाख ५० हजार ३५२ रुपयांचा दंड वसूल केला आहे.

यामध्ये सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करणाऱ्या ३८ हजार ३०४ नागरिकांकडून सर्वाधिक २ कोटी १७ लाख २० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. महापालिकेच्या या कारवाईत रस्त्याकडेला थुंकणे, लघवी करणे, सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे, अस्वच्छता करणे अशा वेगवेगळ्या १३ प्रकारच्या बाबींवर कारवाई करण्यात येते.




### जनजागृतीची गरज...

» महापालिकेने नेमलेल्या पथकांकडून शहरातील काही ठराविक भागांतच कारवाई होते, त्यामुळे अशा भागांमध्ये जनजागृती केल्यास अस्वच्छतेला आळा बसू शकतो. विशेष म्हणजे, केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत पालिकेकडून जनजागृतीसाठी प्रामुख्याने सार्वजनिक भिंतींवर तसेच रेडिओवर जाहिराती केल्या जातात. मात्र, प्रत्यक्षात सर्वच क्षेत्रीय कार्यालयांत मोठ्या सोसायट्या तसेच वस्ती पातळीवर लक्ष देणे गरजेचे ठरत आहे.

महापालिकेकडून १५ क्षेत्रीय कार्यालयांसाठी स्वतंत्र १५ दक्षता पथकांची स्थापना करण्यात आली असून, ही पथके दिवसभर आपल्या-आपल्या क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत फिरून कारवाई करतात. याशिवाय नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या आधारेही संबंधितांवर कारवाई करून दंड वसूल केला जातो.

महापालिकेने नेमलेल्या पथकांकडून शहरातील काही ठराविक भागांतच कारवाई होते, त्यामुळे अशा भागांमध्ये जनजागृती केल्यास अस्वच्छतेला आळा बसू शकतो. विशेष म्हणजे, केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत पालिकेकडून जनजागृतीसाठी प्रामुख्याने सार्वजनिक भिंतींवर तसेच रेडिओवर जाहिराती केल्या जातात. मात्र, प्रत्यक्षात सर्वच क्षेत्रीय कार्यालयांत मोठ्या सोसायट्या तसेच वस्ती पातळीवर लक्ष देणे गरजेचे ठरत आहे. महापालिकेकडून शहर स्वच्छतेसाठी जनजागृती केली जात १ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत महापालिकेकडून शहरात अस्वच्छता करण्यास जबाबदार असलेल्या ५३ हजार ३९३ पुणेकरांवर कारवाई करीत त्यांच्याकडून तब्बल ३ कोटी ७७ लाख ५० हजार ३५२ रुपयांचा दंड वसूल केला आहे.

### पुणेकरांनी भरलेला एकूण दंड

- सार्वजनिक ठिकाणी थुंकणे : ८ लाख ४६ हजार
- रस्त्यावर लघवी करणे : १६ लाख ९३ हजार १००
- कचरा जाळणे : ३ लाख २० हजार
- कचरा वर्गीकरण न करणे : १० लाख १८ हजार ७८०
- अस्वच्छता करणे : २ कोटी १७ लाख २० हजार
- बल्क वेस्ट जनरेटर दंड : ५ लाख ८३ हजार
- बांधकाम राडारोडा : ३७ लाख २८ हजार
- प्लास्टिक विक्री : ७१ लाख १० हजार
- बायोमेडिकल वेस्ट : ३ लाख १३ हजार

### दक्षता पथकांची स्थापना

» महापालिकेकडून १५ क्षेत्रीय कार्यालयांसाठी स्वतंत्र १५ दक्षता पथकांची स्थापना करण्यात आली असून, ही पथके दिवसभर आपल्या-आपल्या क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत फिरून कारवाई करतात. याशिवाय नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या आधारेही संबंधितांवर कारवाई करून दंड वसूल केला जातो.

# पुणे महापालिकेत स्वतंत्र सांस्कृतिक समिती स्थापन व्हावी; सांस्कृतिक क्षेत्रातून रंगकर्मींची मागणी

## संगीत-नृत्य परंपरा, उत्सव-कार्यक्रम ,कलाकारांचे प्रश्न यांचा योग्य विचार आणि संवर्धन करण्यासाठी स्वतंत्र सांस्कृतिक समिती असणे अत्यावश्यक आहे

**पुणे | प्रतिनिधी**

शहराच्या प्रशासनात शिक्षण मंडळ, वृक्ष प्राधिकरण समिती, पीएमपीएमएल समिती, जिल्हा नियोजन आदी विविध महत्त्वाच्या समित्या कार्यरत असतात. मात्र, महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळख असलेल्या पुणे शहरातील महापालिकेत आतापर्यंत स्वतंत्र सांस्कृतिक समिती अस्तित्वात नाही. महापालिकेत स्वतंत्र सांस्कृतिक समितीची स्थापना करण्यात यावी, अशी मागणी सांस्कृतिक क्षेत्रातून जोर धरत आहे.

पुणे शहर हे केवळ शैक्षणिक किंवा औद्योगिक नव्हे, तर ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि कलात्मक वारसाचे केंद्र आहे. पुण्याने महाराष्ट्राला आणि देशाला अनेक दिग्गज कलाकार दिले आहेत. नाट्य, चित्रपट, संगीत आणि साहित्य क्षेत्रातील अनेक कलाकार पुण्यात घडले, वाढले आणि आजही येथे वास्तव्य करीत आहेत. या शहरातील नाट्यगृहे, सांस्कृतिक केंद्रे, संगीत-नृत्य परंपरा, उत्सव-कार्यक्रम आणि कलाकारांचे प्रश्न यांचा योग्य विचार आणि संवर्धन करण्यासाठी महानगरपालिकेत स्वतंत्र सांस्कृतिक समिती असणे अत्यावश्यक आहे. आजच्या घडीला मुंबईप्रमाणेच पुणे शहरातही मोठ्या प्रमाणावर चित्रपट, वेब सिरीज, मालिका आणि जाहिरातींचे शूटिंग होत आहे. या शूटिंगसाठी आवश्यक असलेल्या परवानग्या, नियोजन, कलाकार आणि तंत्रज्ञांना सुविधा मिळाव्यात यासाठी देखील महानगरपालिकेत सांस्कृतिक समिती असणे काळाची गरज असल्याचे सांस्कृतिक विश्वाचे म्हणणे आहे.




> पुण्यात महापालिकेतर्फे महोत्सव, पुरस्कारांचे कार्यक्रम व्हायचे. पण आता काहीही होत नाही. पुण्यातील कलाकारांना व्यासपीठ मिळायला हवे. नृत्यात्मक कार्यक्रमांसाठी स्वतंत्र थिएटर असावे. सांस्कृतिक समिती सर्व कलांसह साहित्यिक, रंगकर्मी यांना सामावून घेणारी हवी
>
> - निकिता मोघे, प्रसिद्ध नृत्यदिग्दर्शिका.

> पुण्यात गेल्या ७५ वर्षांत पुणे शहराने असंख्य नामवंत मराठी कलाकार, साहित्यिक, रंगकर्मी घडवले. महाराष्ट्रातील कोणत्याही महानगरपालिकेकडे नसतील एवढी नाट्यगृहे पुणे महानगरपालिकेकडे आहेत; मात्र ही वस्तुस्थिती असताना देखील आजपर्यंत पुणे महानगरपालिकेत स्वतंत्र सांस्कृतिक समिती स्थापन करण्यात आलेली नाही, ही अत्यंत दुर्दैवी आणि गंभीर बाब आहे.
>
> - बाबासाहेब पाटील, प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी

# पुण्यातील भिडे वाडा स्मारकासाठी जुलैपर्यंत प्रतीक्षा

## भिडे वाडा स्मारकाचे स्थापत्य पूर्ण, उर्वरित कामांसाठी जुलैपर्यंत प्रतीक्षा

**पुणे | प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज रस्त्यावरील ऐतिहासिक भिडे वाडा स्मारकाचे काम मार्चपर्यंत पूर्ण करण्याचे महापालिका प्रशासनाने निश्चित केले होते. स्मारकाची स्थापत्यविषयक कामे आतापर्यंत पूर्ण झाली आहेत. मात्र उर्वरित पुतळे, कलाकुसर, दृकश्राव्य व ध्वनी व्यवस्था अशी कामे अजूनही अपूर्ण आहेत. ही कामे पूर्ण होण्यासाठी आता जुलैपर्यंत वाट पहावी लागण्याची चिन्हे आहेत.

महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी १८४८ मध्ये देशातील पहिली मुलींची शाळा बुधवार पेठेतील भिडे वाड्यामध्ये सुरू केली होती. संबंधित वाड्याचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन भिडे वाड्याचे राष्ट्रीय स्मारकात रूपांतर करण्याची मागणी विविध संस्था, संघटना व राजकीय पक्षांकडून केली जात होती.



अनेक आंदोलनानंतर भिडे वाड्याचे स्मारक करण्याचे महापालिकेने निश्चित केले होते.

दरम्यान, जागा मालक व भाडेकरूंच्या प्रलंबित प्रश्नामुळे व महापालिका प्रशासनाने कायदेशीर लढा दिल्यानंतर अखेर १३ वर्षांनी स्मारकाच्या कामाचा मार्ग मोकळा झाला. महापालिकेने भिडे वाडा स्मारकाचा आराखडा तयार करून घेतला.

त्यानंतर स्मारकाच्या २०२४ मध्ये कामासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. मागील काही महिन्यांपासून लोखंडी फ्रेमचे काम पूर्ण करून स्लॅबचे काम करण्यात आले. मार्च २०२६पर्यंत स्मारकाची उर्वरित कामे पूर्ण होतील, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले होते. मात्र बरीच कामे अद्याप झालेली नाहीत. आतापर्यंत ७० टक्के काम झाले आहे.

भिडे वाडा येथील स्मारक पार्किंग व तळमजला अधिक तीन असे चार मजल्यांचे करण्याचा निर्णय घेण्यात आला. तळमजल्यावर महात्मा फुले आणि सावित्रीमाई फुले यांचा पुतळा, त्यांचा जीवनपट दर्शविणारे म्युरल्स किंवा चित्रमय जीवनप्रवास असणार आहे. वरच्या मजल्यावर त्यांच्या जीवनातील प्रसंग, कार्याची माहिती स्क्रीनवर दृकश्राव्य स्वरुपात दर्शविण्याची यंत्रणा तसेच त्यांचे लेखन साहित्य असणार आहे. त्याशिवाय वरील मजल्यावर मुली, महिलांच्या कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण संस्था उभारण्याचे निर्देश देण्यात आले. जुलै अखेरीस या कामाचे भूमिपूजन करायचे असल्याने स्मारकाचे अंदाजपत्रक तयार करुन निविदा प्रक्रिया राबविण्याच्या दृष्टीने गतीने कार्यवाही करण्याच्या सूचना यावेळी मंत्रीद्वयींनी दिल्या.

ऐतिहासिक भिडे वाडा स्मारकाचे काम मार्चपर्यंत पूर्ण करण्याचे महापालिका प्रशासनाने निश्चित केले होते. स्मारकाची स्थापत्यविषयक कामे आतापर्यंत पूर्ण झाली आहेत. मात्र उर्वरित पुतळे, कलाकुसर, दृकश्राव्य व ध्वनी व्यवस्था अशी कामे अजूनही अपूर्ण आहेत. ही कामे पूर्ण होण्यासाठी आता जुलैपर्यंत वाट पहावी लागण्याची चिन्हे आहेत.

### स्मारकाची वैशिष्ट्ये

- स्मारक तीन मजल्यांचे असणार
- स्मारकामध्ये सावित्रीबाई फुले यांचा जीवनपट, प्रशिक्षण वर्गासाठी खोल्या
- दृक-श्राव्य सादरीकरणासाठी खास व्यवस्था

> भिडे वाड्याच्या स्मारकाचे लोखंडी फ्रेम, स्लॅब असे स्थापत्यविषयक कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी सध्या गती दिली जात आहे. जुलैपर्यंत स्मारकाची सर्व कामे पूर्ण होऊ शकतील.
>
> -रोहिदास गव्हाणे, अधीक्षक अभियंता, भवन विभाग, महापालिका

# ठेकेदारांना राजकारणात थारा नाही; उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भूमिका

## राजकारणात ठेकेदारांना थारा देणार नाही. त्यांनी राजकारण करावे, नाही तर ठेकेदारी करावी,' अशी भूमिका उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केली

**पुणे | प्रतिनिधी**

'जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये यंदा तरुणांना संधी देण्यात आली आहे. राजकारणात ठेकेदारांना थारा देणार नाही. त्यांनी राजकारण करावे, नाही तर ठेकेदारी करावी,' अशी भूमिका उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केली.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवारी कण्हेरी येथील मारुती मंदिरात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचाराचा आरंभ केला. त्या वेळी ते बोलत होते.

अजित पवार म्हणाले, 'कार्यकर्त्यांची संख्या वाढत चालली आहे. त्यामुळे इच्छुकांची संख्या वाढली आहे. मात्र, या वेळी तरुण आणि सुशिक्षित उमेदवारांना संधी देण्यावर भर दिला आहे. यापूर्वी महिलांना संधी देण्यासाठी घरी जाऊन विनंती करावी लागायची. आता महिला स्वतःहून पुढे येत आहेत. यंदा पीएच.डी. पदवी संपादन केलेल्या महिलेलाही संधी दिली आहे. मात्र, राजकारणात ठेकेदारांना थारा देणार नाही. त्यांनी राजकारण करावे, नाही तर ठेकेदारी करावी.'

'बारामतीचा विकास थांबणार नाही. बारामतीत ४३ कोटींची यशवंतराव चव्हाण अभ्यासिका, ३९४ कोटींचे आयुर्वेदिक महाविद्यालय, १००० कोटींची कऱ्हा-निरा उपसा सिंचन योजना, ४३८ कोटींची जनाई-शिरसाई बंदिस्त पाइपलाइन योजना, ३०० कोटींचे कर्करोग रुग्णालय, ७५ कोटींचे क्रीडा संकुल असे अनेक प्रकल्प सुरू आहेत. पुरंदर येथे छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ होणार आहे,' असेही पवार म्हणाले. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, 'काही लोक कान भरतात. मी हलक्या कानाचा नाही. १९९२ पासून निवडणुकीत आहे. इंदापूरमध्ये हर्षवर्धन पाटील, दत्तात्रय भरणे एकत्र आले, तर काय बिघडले?'

### भरणे-पाटील एकत्र आले, तर काय बिघडले?

- इंदापूरमध्ये कृषिमंत्री दत्तात्रय भरणे आणि माजी मंत्री हर्षवर्धन पाटील एकत्र आले आहेत. याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, 'काही लोक कान भरतात. मी हलक्या कानाचा नाही. १९९२ पासून निवडणुकीत आहे. इंदापूरमध्ये हर्षवर्धन पाटील, दत्तात्रय भरणे एकत्र आले, तर काय बिघडले?'